महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



# थोडक्यात पण महत्वाचे



## नियंत्रणासाठी प्रकाश सापळे लावणे फायदेशीर - विकास चव्हाण

आळेफाटा (स. गांवकरी) : उसातील हुमणी किडीच्या नियंत्रणासाठी पहिल्या पावसानंतर शेतात प्रकाश सापळे लावावेत, असे आवाहन विघ्नहर साखर कारखान्याचे तज्ज्ञ संचालक व 'आत्मा' सदस्य विकास चव्हाण यांनी केले आहे. पहिल्या पावसानंतर बाहेर पडणारे हुमणीचे भुंगेरे संध्याकाळी ७ ते ११ दरम्यान प्रकाशाकडे आकर्षित होतात. यावेळी शेतात बल्बखाली पाण्याने भरलेले टप ठेवल्यास भुंगेरे त्यात पडून मरतात. एक मादी ६० अंडी घालते, त्यामुळे एक भुंगा पकडला म्हणजे ६० अळ्या रोखल्या जातात. हा उपाय बिनखर्चिक व पर्यावरणपूरक आहे.शेतकऱ्यांनी पकडलेले भुंगेरे विघ्नहर कारखान्याच्या गट कार्यालयात जमा करावेत. कारखान्याकडून २०० प्रति किलो दर दिला जात आहे. हुमणीची अळी उसाची मुळे कुरतडते, त्यामुळे ऊस वाळतो व उत्पादनात २० ते ४०% पर्यंत घट येते. वेळेत नियंत्रण न केल्यास नुकसान वाढते. सध्या पाऊस सुरू झाल्याने हीच सापळे लावण्याची योग्य वेळ आहे, असे चव्हाण यांनी सांगितले.



## माती परीक्षणावर भर, शाश्वत शेतीचा आधार

खोडद (स. गांवकरी) : भारतात शेतीमध्ये उत्पादन वाढीसाठी अनेक शेतकरी स्वतःच्या अनुभवाने अथवा इतरांच्या सल्ल्याने रासायनिक खतांचा वापर करतात .मात्र जमिनीतील अन्नद्रव्यांची नेमकी स्थिती माहित नसल्याने खतांचा असंतुलित वापर होतो. यामुळे उत्पादन खर्च वाढतो, जमिनीची सुपीकता कमी होते आणि पिकांच्या उत्पादनावरही विपरीत परिणाम होतो. अशा परिस्थितीत माती परीक्षणावर आधारित संतुलित खत व्यवस्थापन ही काळाची गरज असल्याचे नारायणगाव कृषी विज्ञान केंद्राचे मृदा शास्त्रज्ञ योगेश यादव यांनी सांगितले आहे. माती परीक्षणाद्वारे जमिनीतील अन्नद्रव्यांचे प्रमाण, सामू (पीएच), सेंद्रिय कर्ब तसेच सूक्ष्म अन्नद्रव्यांची माहिती मिळते. या अहवालाच्या आधारे पिकांच्या गरजेनुसार योग्य प्रमाणात खतांचा वापर करता येतो. त्यामुळे अनावश्यक खर्च टाळला जातो, जमिनीचे आरोग्य टिकून राहते आणि उत्पादनासह गुणवत्तेतही वाढ होते.

## शरदचंद्रच्या १६ व्या शाखेचे उद्घाटन



खोडद (स. गांवकरी) : शरदचंद्र नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित राजुरी च्या 16 व्या कल्याण शाखेचा उद्घाटन सोहळा रविवार दिनांक 31/05/2026 रोजी दुपारी ठीक 12.15 वा. मा.ह.भ.प.डॉ. श्यामसुंदर महाराज सोन्नर व मा. ह.भ.प. संदीप महाराज डुंबरे यांचे करकमलांनी संपन्न झाला. या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी खालील मान्यवरांची उपस्थिती लाभली. मा. सौ. सुलभाताई गणपत गायकवाड आमदार कल्याण विधानसभा,मा. श्री. नाना सूर्यवंशी जिल्हाध्यक्ष ,मा. श्री. निलेशजी शिंदे स्थानिक नगरसेवक ,मा. श्री. अरविंदजी पोटे माजी नगरसेवक , मा. श्री. सचिनजी पोटे स्थानिक नगरसेवक ,मा. श्री. राठोड साहेब व्यवस्थापक सारस्वत बँक व स्थानिक अधिकारी पदाधिकारी इतर क्षेत्रातील मान्यवर तसेच संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. एम. डी. घंगाळे सा़ो, उपाध्यक्ष मा. श्री. राजेंद्र विठ्ठल औटी, सचिव मा. श्री. दत्तात्रय कारभारी गंधट, खजिनदार मा. श्री. भिमाजी गणपत मालुस्कर, माजी अध्यक्ष मा. श्री. जी. के. औटी सर, मा. श्री. अनंतराव गटकळ, मा. श्री. नंदकुमार हाडवळे, मा. श्री. नरेंद्र गटकळ, व संस्थेचे सर्व आजी-माजी पदाधिकारी, सर्व संचालक मंडळ, सर्व अधिकारी, सर्व कर्मचारी, सर्व सभासद व ठेवीदार तसेच कृषी, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, वैद्यकीय व इतर क्षेत्रातील मान्यवर यांचे शाखेच्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी उपस्थित राहिल्याबद्दल कल्याण शाखेच्या वतीने आपणा सर्वांचे मनापासून आभार.

## आळेफाट्यात अवैध देशी दारूविक्रीवर पोलिसांची कारवाई

खोडद (स. गांवकरी) : आळेफाटा परिसरातील निंजा चायनीज दुकानाच्या मागील परिसरात सुरू असलेल्या अवैध देशी दारू विक्रीवर पोलिसांनी छापा टाकून १२ बाटल्या जप्त केल्या. या कारवाईत सुमारे ९६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. शनिवारी दुपारी आळेफाटा चौकात सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आर .एम .हिले ,पोलीस कॉन्स्टेबल सचिन कोबल आणि व्हि. डी .दहिफळे हे गस्त घालताना पोलीस निरीक्षक जाधव यांना खबऱ्याकडून माहिती मिळाली. आळेफाटा येथील निंजा चायनीज दुकानाच्या मागे समाधान चत्रभुज गंभीरे वय 42 वर्षे राहणार चैतन्यपूर्ण ,आळेफाटा हा बेकायदा देशी दारूची विक्री करत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर तातडीने कारवाई केली. गंभीरे कडून १८० मिली क्षमतेच्या संत्रा जी. एम. कंपनीच्या १२ सीलबंद देशी दारूच्या बाटल्या आढळल्या.

# डॉ. सुधा कांकरिया यांचे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य : वसंत लोढा

### पंडित दीनदयाळ परीवार प्रतिष्ठानच्या वतीने डॉ.सुधा कांकरिया यांचा सत्कार

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

डॉ. सुधाताई कांकरिया यांचे अहिल्यानगर जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात वेगवेगळ्या उपक्रमांच्या माध्यमातून नावलौकिक होत आहे."बेटी बचाओ बेटी पढाओ", "स्त्री जन्माचे स्वागत करा",महिला मंडळाच्या माध्यमातून महिलांसाठी विविध उपक्रम,मराठवाडा मित्र मंडळाच्या माध्यमातून विविध शैक्षणिक सामाजिक उपक्रमांचे ते आयोजन करीत असतात.

आपण असे म्हणतो की यशस्वी पुरुषाच्या मागे खंबीरपणे उभे असलेली एक स्त्रीच असते. याउलट डॉ.सुधाताई कांकरिया यांच्या संकल्पना मूर्त स्वरूपात कशाप्रकारे आणता येतील. यासाठी प्रयत्न करणारे डॉ.प्रकाश कांकरिया हे आहेत. डॉ.कांकरिया परिवाराने



आरोग्य क्षेत्रापुरतेच काम मर्यादित न ठेवता सामाजिक,सांस्कृतिक,

धार्मिक,शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे कांकरिया दांपत्य आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल येथेही कांकरिया परिवाराचे मोलाचे योगदान आहे. डॉ.सुधाताई कांकरिया यांना नाट्य क्षेत्रातील बाल रंगभूमीचा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. ही अहिल्यानगरकरांसाठी मोठी अभिमानास्पद बाब आहे. पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. यापुढील काळातही डॉ. कांकरिया यांना देशातील सर्वोच्च पुरस्कार मिळो.हीच अपेक्षा आहे. असे प्रतिपादन पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक तसेच पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे चेअरमन वसंत लोढा यांनी केले आहे. रंगारगल्ली येथील पंडित दीनदयाळ नागरी पतसंस्था येथे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद,मध्यवर्ती मुंबईचा बाल रंगभूमीवरील उल्लेखनीय कार्यासाठी 2025- 2026 चा डॉ.सुधाताई कांकरिया यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या वतीने त्यांचा सत्कार ज्येष्ठ रंगकर्मी पी.डी.कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला.याप्रसंगी प्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ.प्रकाश कांकरिया,पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा,सचिव बाळासाहेब भुजबळ,कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल,किशोर गांधी,महावीर कांकरिया,पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे व्यवस्थापक निलेश लाटे,उपव्यवस्थापक सुखदेव दरेकर,उमेश मेरगु आदी उपस्थित होते. पी.डी.कुलकर्णी म्हणाले, अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. कांकरिया करंडक हा गेल्या २५ वर्षापासून महाराष्ट्रात घेतली जाणारी एकमेव स्पर्धा आहे. त्यावेळी राज्य शासनाची कोणतीही स्पर्धा नव्हती. या स्पर्धेत भाग घेतलेली अनेक लहान मुले आज सुपरस्टार झाली आहेत.तसेच ज्येष्ठांसाठी दुसरे बालपण एकांकिका स्पर्धा सुरू करण्यात आली आहे.

नाट्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सुधाताई कांकरिया यांना बाल रंगभूमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे.या पुढील काळातही नाट्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करुन डॉ. सुधाताई कांकरिया योगदान देतील.

सत्काराला उत्तर देताना डॉ. सुधाताई कांकरिया म्हणाल्या, कांकरिया करंडक ही सामूहिक कर्तव्याची जबाबदारी आहे. बाल रंगभूमीला समृद्ध करणे, संपन्न करणे,बालकलाकार घडविणे हा उद्देश ठेवून संपूर्ण टीमने गेल्या पंचवीस वर्षापासून खूप सुंदर काम केले आहे. डॉ.प्रकाश कांकरिया हे कांकरिया करंडकाचे सर्वे सर्वा आहेत.कला ही अशी गोष्ट आहे की ज्या कलेची साधना, आराधना आपण करतो त्यावेळी आपण सर्व काही विसरून जातो.अभ्यास किंवा व्यवसायाच्या दृष्टीने एकाग्रता हवी असल्यास आपल्याला समृद्धीचा मार्ग कलेच्या माध्यमातूनच मिळत असतो. अशा या रंगभूमीला समृद्ध करण्याची संधी नगरकरांनीच दिली आहे.मला मिळालेल्या पुरस्काराचे सर्वश्रेय बालकलाकारांना समर्पित करते.असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सुरज अग्रवाल यांनी केले.तर आभार बाळासाहेब भुजबळ यांनी मानले.

## मंचरमध्ये कांदा प्रश्नावर सर्वपक्षीय आंदोलन

मंचर : (स. गांवकरी)

■ रास्ता रोकोनंतर रोहित पवारांसह नेते ताब्यात

राज्यात कांद्याच्या घसरलेल्या दरामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून त्याचे पडसाद आज पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यात उमटले. मंचर येथील नंदी चौकात कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सर्वपक्षीय आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान पुणे-नाशिक महामार्गावर रास्ता रोको करण्यात आल्याने काही काळ वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली. अखेर पोलिसांनी हस्तक्षेप करून आमदार रोहित पवार यांच्यासह प्रमुख नेत्यांना ताब्यात घेतल्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली. कांद्याला उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी दर मिळत असल्याने राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा, केंद्र आणि राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा तसेच कांदा उत्पादकांना आर्थिक दिलासा द्यावा, या प्रमुख मागण्यांसाठी मंचरच्या नंदी चौकात सर्वपक्षीय आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासूनच परिसरात शेतकरी, कार्यकर्ते आणि विविध पक्षांचे नेते मोठ्या संख्येने जमा झाले होते. आंदोलनापूर्वी आयोजित सभेत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार रोहित पवार, खासदार निलेश लंके, खेडचे आमदार बाबाजी काळे, जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांच्यासह विविध नेत्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात आला.

## समृद्धी महामार्गावर दरोडा टाकणारी आंतरजिल्हा टोळी जेरबंद

*अहिल्यानगर LCB ची कारवाई, ९ लाखांचा मुद्देमाल जप्त*

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

समृद्धी महामार्गावर वाहने अडवून मारहाण करून लुटमार करणारी आंतरजिल्हा टोळी स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या ४ दिवसांत जेरबंद केली आहे. या कारवाईत ६ आरोपींना अटक करून त्यांच्याकडून ९,२७,६००/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दि. २७ मे रोजी दुपारी ३ वाजता लातूर येथील ट्रकचालक दत्ता राजुळे यांना पोल क्रमांक 529.9 जवळ ७ ते ८ आरोपींनी लोखंडी रॉडने मारहाण करून डिझेल व रोख रक्कम असा ७,४६५ रुपयांचा मुद्देमाल लुटला. त्याच टोळीने वॅगनर कारचालक दांपत्याला दमदाटी करून १,२४,०००/-रुपयांचे दागिने व रोख रक्कम काढून घेतली. त्यानंतर ट्रक क्रमांक बीआर 03 जीबी 4883 वरील चालकाला मारहाण करून १५० लिटर डिझेल व ४,१००/-रुपये



रोख असा १८९५०/- रुपयांचा मुद्देमाल चोरला. एकूण १,५०,४१५ /- रुपयांचा दरोडा टाकण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व LCB चे पोनि किरणकुमार कबाडी यांनी घटनास्थळी भेट दिली. LCB च्या पथकाने तांत्रिक कौशल्याच्या आधारे तपास करत १ जून रोजी अंबड, जि. जालना येथून निखील गोरे (१९) व एका विधीसंघर्षित बालकाला ताब्यात घेतले. त्यानंतर २ जून रोजी कोकमठाण येथून शिवनाथ आव्हाड (२४), ओम खरात (१९), राहुल कोकाटे (२३) व साईराज शहाणे (२१) यांना अटक करण्यात आली. अटक आरोपींकडून व्हेरना व स्विफ्ट कार, ६ मोबाईल, रोख रक्कम असा एकूण ९,२८,६००/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. टोळीतील आणखी ३ आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात गु.र.नं. 227/2026 नुसार गुन्हा दाखल आहे. अटक आरोपी व मुद्देमाल पुढील तपासासाठी कोपरगाव तालुका पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि किरणकुमार कबाडी, पोउपनि महादेव गुट्टे, विजय पवार, फुरकान शेख व इतर पथकाने केली.

## सुपा एमआयडीसीत कंपनी व्यवस्थापकाला मारहाण लंके प्रतिष्ठानच्या तालुकाध्यक्षावर मारहाणीचा कट रचल्याचा गुन्हा

### पोलिसांची धडाकेबाज कारवाई; हल्ला करणाऱ्या टोळीतील आरोपी ताब्यात

पारनेर : (स. गांवकरी)

सुपा एमआयडीसी परिसरात कॉन्ट्रॅक्ट न मिळाल्याच्या रागातून सिलॉन बेव्हेरेज कॅन प्रा.लि.च्या एच.आर. हेड यांना मारहाण व लुटमार करणाऱ्या टोळीचा सुपा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. निलेश लंके प्रतिष्ठानचे तालुकाध्यक्ष सतीश भालेकर याच्या सूत्रधारतेने ही घटना घडली असून, पोलिसांनी मुख्य आरोपीला अटक केली आहे. या धडाकेबाज कारवाईमुळे औद्योगिक क्षेत्रात दहशत माजवणाऱ्या गुंडांचे धाबे दणाणले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सिलॉन बेव्हरेज कॅन प्रा. लि. कंपनीचे कॉन्ट्रॅक्ट मिळवण्यासाठी आरोपी वैभव रामदास रिकामे हा निलेश लंके प्रतिष्ठानचे पारनेर तालुकाध्यक्ष सतीश मोहन भालेकर याच्या सांगण्यावरून कंपनीचे एच.आर. हेड



महाडीक यांच्याकडे गेला होता. मात्र, कॉन्ट्रॅक्ट देण्यास नकार मिळाल्याने आरोपींच्या मनात सूडाची भावना निर्माण झाली.

या रागातून सतीश मोहन भालेकर याच्या नियोजित कटाप्रमाणे वैभव रिकामे, अविनाश बोरकर, बादल आडे आणि चार विधीसंघर्षित बालकांनी मिळून महाडीक यांना रुईछत्रपती फाटा येथे अडवले. आरोपींनी त्यांना जबर मारहाण केली आणि सुपा एमआयडीसीत पुन्हा कामावर न येण्याची धमकी दिली. तसेच, त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन हिसकावून घेत आरोपी पसार झाले. याप्रकरणी सुपा पोलीस स्टेशनमध्ये विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस आतापर्यंत वैभव रिकामे याला अटक करून दोन विधीसंघर्षित बालकांना बालन्यायमंडळासमोर हजर केले आहे. उर्वरित फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके युद्धपातळीवर काम करत आहेत.

या गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर, सुपा पोलीस स्टेशनने म्हसणे फाटा व सुपा एमआयडीसीतील सर्व कंपनी व्यवस्थापकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

कोणत्याही व्यक्तीने किंवा गटाने कॉन्ट्रॅक्टसाठी दमदाटी, पैशांची मागणी किंवा दबाव आणल्यास तत्काळ पोलीस प्रशासनाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. एमआयडीसी क्षेत्रात कोणत्याही प्रकारची गुन्हेगारी प्रवृत्ती खपवून घेतली जाणार नाही, असा सज्जड इशारा पोलिसांनी दिला आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली मंगेश नागरगोजे, मरकड, माळवदे, सातपुते, कोल्हे आणि गायकवाड यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली असून, पोलिसांच्या या सतर्कतेचे औद्योगिक क्षेत्रातून कौतुक होत आहे.

## प्री-मॉन्सून गेट-टुगेदर उत्साहात संपन्न

मुंबई : (स. गांवकरी)

विलेपार्ले पश्चिम येथील नानावटी हॉस्पिटलच्या सभागृहात आयोजित प्री-मॉन्सून गेट-टुगेदर कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. गुजराती गौरव फाउंडेशन (GGF) तर्फे आयोजित या कार्यक्रमाला समाजसेवक श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला, श्री दिनेशभाई हिम्मतभाई ठक्कर तसेच प्रमुख श्री निमीष ठक्कर, श्रीमती आशा शाह, श्रीमती पूर्णिमा मेहता, श्री राजेश मेहता आणि श्री नागेश मौर्य यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमात महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. नृत्य, गायन, नाटिका आणि इतर कलाविष्कारांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजनबद्ध आयोजन आणि आनंददायी वातावरण हे विशेष आकर्षण ठरले. यावेळी समाजसेवक श्री नानजीभाई ठक्कर यांनी महिला



सक्षमीकरण, सामाजिक एकता आणि सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. अशा कार्यक्रमांमुळे महिलांना आपले कलागुण सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळते आणि परस्परांतील स्नेहभाव अधिक दृढ होतो, असे त्यांनी सांगितले. नानावटी हॉस्पिटलचे कॅन्सरतज्ज्ञ डॉ. वैभव चौधरी यांनी विनोदी आणि प्रभावी शैलीत कॅन्सरविषयी मार्गदर्शन करत उपस्थितांना महत्त्वपूर्ण माहिती दिली.

पुरुषोत्तम महिन्याच्या निमित्ताने १२५ भगवदीयांनी एकत्र येऊन श्रीमद्भगवद्गीतेच्या १५व्या अध्यायाचे पठण केले. तसेच "आंबुडू जांबुडू" या लोकप्रिय लोकगीताच्या सामूहिक गायनाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

# माऊलींच्या संजीवन समाधी सोहळ्याच्या वर्णनाने भाविक भारावले

## माऊलींच्या संजीवन समाधीचे वर्णन म्हणजे भक्ती, ज्ञान आणि वैराग्याचा दिव्य संगम" – ह.भ.प. निळकंठ देशमुख

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अधिक मासानिमित्त सुरू असलेल्या सनातन धर्म सभेमध्ये ह.भ.प. निळकंठ देशमुख यांनी "माऊली संजीवन समाधी सोहळा" या विषयावर केलेल्या हृदयस्पर्शी प्रवचनाने उपस्थित भाविकांना संतसाहित्य, भक्ती आणि अध्यात्माच्या अद्भुत विश्वाची अनुभूती दिली. माऊलींच्या संजीवन समाधीचे वर्णन करताना त्यांनी संत नामदेव महाराजांच्या गाथेतील दाखल्यांच्या आधारे समाधी सोहळ्याचा दिव्य आणि अलौकिक प्रसंग उलगडून सांगितला. प्रवचनात त्यांनी सांगितले की, संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन



समाधी सोहळ्यासाठी स्वतः पांडुरंग परमात्मा, विविध ऋषी-मुनी, संत-महात्मे आणि देवगण उपस्थित होते. त्या दिव्य सोहळ्याच्या स्वागतासाठी विश्वकर्म्याने संपूर्ण अलंकापुरी नगरी चंदनाच्या कमानींनी सजविली होती. सुगंधी फुले, विविध वेलींनी नटलेली नगरी विलक्षण तेजाने उजळून निघाली होती. अलंकापुरीतील प्रत्येक कण भक्ती आणि चैतन्याने भारलेला होता.

समाधी सोहळ्याच्या दिवशी माऊलींचे परमभक्त संत चांगदेव महाराज यांनी माऊलींची पाद्यपूजा केली. एकादशीच्या दिवशी माऊलींचे अखेरचे प्रवचन झाले. त्या प्रवचनात त्यांनी सद्गुरूंचे महात्म्य, अध्यात्मातील गुरुतत्त्वाचे स्थान आणि मानवकल्याणाचा संदेश देणाऱ्या पसायदानाचे स्मरण करून दिले. माऊलींच्या प्रत्येक शब्दातून करुणा, ज्ञान आणि विश्वकल्याणाची भावना प्रकट होत होती.

यानंतर रात्री संत नामदेव महाराजांचे कीर्तन झाले. कीर्तनातून भक्तीचा महासागर उसळला आणि संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेला. द्वादशीला पारणे झाल्यानंतर माऊलींनी संजीवन समाधी स्वीकारून हा अद्वितीय समाधी सोहळा पूर्णत्वास नेला. त्या वेळी स्वर्गातून पुष्पवृष्टी झाल्याचे वर्णन संत नामदेव महाराजांनी आपल्या गाथेत केले असल्याचे देशमुख यांनी सांगितले. माऊली समाधीत जात असताना उपस्थित संत, महात्मे आणि भक्तगणांच्या मनात अपरंपार दुःख दाटून आले होते. मात्र स्वतः माऊली पूर्णपणे शांत, स्थिर आणि निर्विकार अवस्थेत होते. संसाराच्या पलीकडील आत्मज्ञानाची सर्वोच्च अवस्था त्यांनी त्या प्रसंगी जगासमोर ठेवली. आजही माऊलींच्या समाधीचे वर्णन वाचताना आणि ऐकताना भाविकांचे अंतःकरण हेलावून जाते, असे त्यांनी नमूद केले. देशमुख यांनी पुढे सांगितले की, या सर्व घटनांचे सविस्तर आणि जिवंत वर्णन संत नामदेव महाराजांनी आपल्या गाथेत जतन करून ठेवले आहे. त्यामुळे सुमारे सातशेहून अधिक वर्षांनंतरही भक्तांना त्या दिव्य सोहळ्याचा अनुभव शब्दांमधून घेता येतो. संत नामदेवांनी केलेल्या या वर्णनामुळे माऊलींच्या समाधी सोहळ्याचे चैतन्य आजही जिवंत असल्याची अनुभूती भाविकांना मिळते. प्रवचनादरम्यान माऊलींच्या संजीवन समाधीमागील तत्त्वज्ञान, गुरुपरंपरेचे महत्त्व, भावदीपिकेतील विचार आणि भक्तीमार्गाचे विवेचन अत्यंत ओघवत्या शैलीत करण्यात आले. त्यामुळे उपस्थित श्रोते अक्षरशः मंत्रमुग्ध झाले होते.

### संत नामदेव गाथेत जतन झालेला समाधी सोहळा

- माऊलींच्या समाधी सोहळ्यासाठी स्वयं पांडुरंग परमात्मा उपस्थित होते.
- विश्वकर्म्याने अलंकापुरीत चंदनाच्या कमानी उभारल्या होत्या.
- संत चांगदेव महाराजांनी माऊलींची पाद्यपूजा केली.
- एकादशीला माऊलींचे अखेरचे प्रवचन झाले.
- रात्री संत नामदेव महाराजांचे कीर्तन संपन्न झाले.
- द्वादशीला पारणे झाल्यानंतर माऊलींनी संजीवन समाधी स्वीकारली.
- समाधीवेळी स्वर्गातून पुष्पवृष्टी झाल्याचे वर्णन गाथेत आढळते.
- संत नामदेव महाराजांच्या गाथेमुळे हा दिव्य प्रसंग आजही भाविकांना अनुभवता येतो.

कार्यक्रमास उमेश नगरकर, निसळशास्त्री, उमेश वाळुंजकर, निलेश धर्माधिकारी, डॉ. मुंबई दिनकर देशमुख, गावडे प्रदीप, हेमंत देशमुख तसेच गीता मंडळाच्या भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# घुसखोरांची एटीएस मार्फत चौकशी करा आमदार संग्राम जगताप यांची मागणी

- अवैध घुसखोरीच्या विरोधात जनआक्रोश
- पारनेरमध्ये सकल हिंदू समाजाचा भव्य 'रास्ता रोको'



पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर तालुक्यातील वडझिरे व परिसरातील गावांमध्ये काही बांगलादेशी घुसखोर व रोहिंग्यांनी अनधिकृतपणे वास्तव्य करून स्थानिक नागरिकांना त्रास देणे आणि जमिनी हडपण्याचे प्रकार सुरू केले असल्याचा आरोप करत आमदार संग्राम जगताप यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. देवी भोयरे फाटा येथे स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने आयोजित करण्यात आलेल्या रस्ता रोको आंदोलनामध्ये सहभागी होऊन त्यांनी प्रशासनाला सज्जड इशारा दिला. आमदार संग्राम जगताप यांनी स्पष्टपणे मागणी केली की, या भागातील कथित घुसखोरांची केवळ स्थानिक पातळीवर चौकशी न करता ती दहशतवाद विरोधी पथकामार्फत (ATS) करण्यात यावी. स्थानिक नागरिकांच्या जमिनी बळकावण्याच्या वाढत्या घटनांमुळे जनतेमध्ये असंतोष असून, प्रशासनाने यावर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा स्थानिक नागरिक स्वतःच या घुसखोरांचा बंदोबस्त करतील, असा इशारा त्यांनी दिला. वडझिरे परिसरासह संपूर्ण पारनेर तालुक्यातून अशा अवैध घुसखोरांचा बीमोड करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. जर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले, तर भविष्यात यापेक्षाही मोठे आंदोलन उभारले जाईल आणि प्रशासनाच्या परवानगीची वाट न पाहता कायदा हातात घेऊन नागरिक या घुसखोरांचा बंदोबस्त करतील, अशा शब्दांत त्यांनी आपला पवित्रा मांडला.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील वडझिरे आणि परिसरात वाढत्या अवैध घुसखोरीच्या मुद्द्यावरून स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घुसखोरीच्या विरोधात आणि प्रशासनाला जागे करण्यासाठी सोमवारी १ जून २०२६ रोजी आमदार संग्राम जगताप व सागर बेग यांच्या नेतृत्वाखाली'सकल हिंदू समाजा'च्या वतीने पारनेर-बेल्ह-आळेफाटा रोडवरील देवीभोयरे फाटा येथे भव्य 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून परिसरात रोहिंग्या आणि बांगलादेशी घुसखोरांची वाढती संख्या , तसेच बांगलादेशी जिहादी वृत्तीच्या वाढत्या घटनांमुळे स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या गंभीर प्रकारांना आळा घालण्यासाठी आणि प्रशासनावर दबाव निर्माण करण्यासाठी हे आंदोलन पुकारण्यात आले होते. आंदोलनादरम्यान 'अवैध घुसखोरीच्या विरोधात सकल हिंदू समाज मैदानात' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

या आंदोलनात सकल हिंदू समाजाचे शेकडो बांधव, महिला, युवक आणि युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी हिंदुत्ववादी आमदार संग्रामभैय्या जगताप आणि धर्मरक्षक सागर बेग यांची विशेष उपस्थिती होती. आपल्या भाषणातून त्यांनी प्रशासनाला थेट इशारा दिला की, जर तातडीने या घुसखोरांची ओळख पटवून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली गेली नाही, तर हे जनआंदोलन अधिक तीव्र केले जाईल. आंदोलकांकडून करण्यात आलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये घुसखोरांचा शोध घेऊन त्यांना तातडीने बाहेर काढणे आणि परिसरातील असुरक्षिततेचे वातावरण दूर करणे, यांचा समावेश आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर देवीभोयरे फाटा परिसरात तणावपूर्ण शांतता होती. आंदोलनाच्या अनुषंगाने कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून स्थानिक प्रशासनाने परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. या आंदोलनाने प्रशासनाला आपल्या भूमिकेवर पुनर्विचार करण्यास भाग पाडले असून, स्थानिक नागरिकांमध्ये वाढत्या घुसखोरीबाबत असलेल्या भीती आणि असंतोषाची दखल आता सरकारला घ्यावीच लागणार आहे. या आंदोलनामुळे पारनेर-बेल्ह-आळेफाटा मार्गावरील वाहतूक काही काळासाठी ठप्प झाली होती.

### कायदा हातात घेण्यास भाग पाडू नका

जर प्रशासनाने या घुसखोरांवर कारवाई करण्यास टाळाटाळ केली, तर भविष्यात यापेक्षा तीव्र आंदोलन करण्यात येईल. इतकेच नव्हे, तर प्रशासनाच्या परवानगीची वाट न पाहता कायदा हातात घेऊन नागरिक स्वतः या घुसखोरांचा बंदोबस्त करतील, असा इशारा त्यांनी आंदोलनाच्या माध्यमातून आमदार संग्राम जगताप यांनी दिला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### नागोराव शेंडगे बापू यांना पुरस्कार प्रदान

भोकर (स. गांवकरी) : बहुजन समाजाच्या न्याय, हक्क आणि स्वाभिमानासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नागोराव शेंडगे बापू यांना प्रतिष्ठेचा 'शिव छत्रपती सामाजिक आदर्श राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. दै. रोखठोकच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य सोहळ्यात गोव्याचे माजी उपमुख्यमंत्री चंद्रकांत कवळेकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. बहुजन समाजाच्या हक्कांसाठी सातत्याने लढणारे नागोराव शेंडगे हे आज महाराष्ट्रातील बहुजन चळवळीतील एक अभ्यासू, संघर्षशील आणि प्रेरणादायी नेतृत्व म्हणून ओळखले जातात. शिव, शाहू, फुले, आंबेडकर आणि अण्णाभाऊ साठे यांच्या समतावादी विचारांचा वारसा जपत त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी अर्पण केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी बहुजन समाजातील वंचित, शोषित आणि उपेक्षित घटकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य केले आहे. अन्यायाविरुद्ध आंदोलने, मोर्चे, मेळावे, जनजागृती अभियान आणि संघटनात्मक बांधणीच्या माध्यमातून त्यांनी समाजाला एकत्र आणण्याचे मोलाचे कार्य केले आहे. या गौरव सोहळ्यावेळी मंचावर प्रशांत सातव, डॉ. पंकज भिवटे आणि शिवराज नायकवडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी नागोराव शेंडगे यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या संघर्षमय आणि समर्पित जीवन प्रवासाचे कौतुक केले. हा पुरस्कार दै. रोखठोकच्या वर्धापन दिनानिमित्त प्रदान करण्यात आला. दै. रोखठोकचे संपादक सुरेश माडकर, कार्यकारी संपादक डॉ. सुरेश राठोड आणि उपसंपादक डॉ. गुंडोपंत सुतार यांच्या वतीने हा सन्मान देण्यात आला . नागोराव शेंडगे यांना मिळालेल्या या प्रतिष्ठित पुरस्काराबद्दल भोकर तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रभरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

### रोजगाराभिमुख शिक्षणाची सुवर्णसंधी; १३ जून २०२६ पर्यंत अर्ज

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये महाराष्ट्र शासनाच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या अप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (AEDP) अंतर्गत विविध पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून इच्छुक विद्यार्थ्यांनी १३ जून २०२६ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना नियमित पदवी शिक्षणासोबत उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष प्रशिक्षण (Apprenticeship) दिले जाणार आहे. विशेषतः सहाव्या सत्रात अप्रेंटिसशिपची संधी उपलब्ध होणार असून Earn and Learn ( कमवा आणि शिका) चा लाभही विद्यार्थ्यांना मिळणार आहे. विद्यापीठाच्या विविध संकुळामध्ये बी.एस्सी. मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी, बी.एस्सी. शुगर अँड अल्कोहोल टेक्नॉलॉजी, बी.एस्सी. आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड आयओटी, बी.एस्सी. हर्बल टेक्नॉलॉजी, बी.एस्सी. डेटा सायन्स, बी.कॉम. बँकिंग अँड टुरिझम तसेच बी.ए. कंटेंट अँड क्रिएटिव्ह रायटिंग हे अभ्यासक्रम उपलब्ध असून प्रत्येक अभ्यासक्रमासाठी ४० प्रवेश क्षमता निश्चित करण्यात आली आहे. प्रवेशासाठी १२ वी विज्ञान अथवा समकक्ष पात्रता आवश्यक असून काही अभ्यासक्रमांसाठी पीसीएम गटाच्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाणार आहे. बी.कॉम. आणि बी.ए. अभ्यासक्रमांसाठी कोणत्याही शाखेतील १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी अर्ज करू शकतात.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान जिल्हास्तरीय मूल्यांकना करिता पात्र



तामसा : (स. गांवकरी)

हदगाव तालुक्यातील येवली व तरोडा या दोन्ही ग्रामपंचायती मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान स्पर्धेत पात्र ठरले आहेत . येवली ग्रामपंचायतीचे मूल्यांकन एक जून रोजी झाली आहे या मूल्यांकनाकरिता सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, यांच्या सह इतर अधिकारी नांदेड जिल्ह्यामध्ये पाहणी करत आहेत त्याच पाहण्याच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय मूल्यांकनाकरिता मोजे येवली तालुका हदगाव येथे या पथकाने भेट दिली या पाहणीत अतिशय काटेकोरपणे चौकशी करण्यात आली व त्या ग्राम पंचायतचे मूल्यांकन या पथकाने केले आहे

येवली या गावाने मोठ्या प्रमाणात विकास कामे केली आहेत तसेच वेगळे सार्वजनिक सामाजिक आरोग्य पाणी, वीज, बालविवाह,योग शिबिरे, कराटे शिबिर लोकसहभागातून कामेही मोठ्या प्रमाणात केल्यामुळे. व गावातील जनतेने व सर्व कर्मचारी सरपंच ग्रामसेवक सदस्य यांच्या अथक प्रयत्नामुळे गावाचा विकास होत आहे त्यामुळे या गावाची मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान या स्पर्धेत येवली ग्रामपंचायत जिल्हास्तरीय मूल्यांकन स्पर्धेत पात्र ठरली आहे.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात कोलंबी ग्रामपंचायतीचा झेंडा

- तालुक्यात प्रथम क्रमांक

नायगाव : (स. गांवकरी)



तालुक्यातील मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत नायगाव तालुक्यातील कोलंबी ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक पटकावत विकासकामांच्या माध्यमातून आपला ठसा उमटविला आहे. ग्रामविकास, स्वच्छता, लोकसहभाग, पारदर्शक प्रशासन आणि विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या जोरावर कोलंबी ग्रामपंचायतीने हा मान मिळविला आहे. राज्य शासनाच्या वतीने दि. 17 सप्टेंबर 2025 ते 31 मार्च 2026 या कालावधीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात आले होते. ग्रामीण भागातील विकासाला चालना देणे, ग्रामपंचायतींची कार्यक्षमता वाढविणे आणि नागरिकाभिमुख प्रशासनाला प्रोत्साहन देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश होता. या कालावधीत कोलंबी ग्रामपंचायतीने विविध विकासकामे, स्वच्छता उपक्रम, ग्रामसुविधा विस्तार, नोंदवही व्यवस्थापन, महसूल वाढ आणि शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून उल्लेखनीय कामगिरी बजावली. अभियानाच्या तालुकास्तरीय मूल्यमापनासाठी अहिल्यानगर येथील तज्ज्ञ पथकाने कोलंबी गावाला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी ग्रामपंचायतीने केलेल्या विकासकामांची तपासणी करण्यात आली तसेच ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय नोंदी, आर्थिक व्यवहार, योजनांची अंमलबजावणी आणि लोकसहभाग यांचे सखोल मूल्यमापन करण्यात आले. पाहणीदरम्यान पथकाने गावातील विविध विकासकामे, स्वच्छता व्यवस्था, सार्वजनिक सुविधा आणि ग्रामस्थांचा सहभाग याबाबत समाधान व्यक्त केले. ग्रामपंचायतीच्या कामकाजातील शिस्तबद्धता, पारदर्शकता आणि नियोजनबद्ध कार्यपद्धतीचेही पथकाने कौतुक केले. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे तालुकाध्यक्ष तथा कोलंबी ग्रामपंचायत अधिकारी टी. जी. रातोळीकर यांच्या कार्यपद्धतीचे विशेष कौतुक करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी घेतलेली मेहनत आणि ग्रामस्थांना सोबत घेऊन केलेले नियोजन यामुळे कोलंबी ग्रामपंचायतीला हा मान मिळाल्याचे मत अधिकाऱ्यांनी व्यक्त केले. कोलंबी ग्रामपंचायतीला मिळालेल्या या यशाबद्दल ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी, विविध समित्यांचे पदाधिकारी तसेच ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण असून, गावाच्या विकासासाठी भविष्यातही अशाच पद्धतीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येत आहे. तालुक्यात प्रथम क्रमांक मिळाल्याने कोलंबी ग्रामपंचायतीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून इतर ग्रामपंचायतींसाठीही हा आदर्श ठरणार आहे.

## वादामुळे विकासकामे ठप्प; पाणीटंचाईने नागरिक हैराण

तामसा : (स. गांवकरी)



हदगाव तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये सध्या प्रशासक राज सुरू असताना ग्रामसेवक आणि प्रशासक यांच्यातील समन्वयाचा अभाव प्रकर्षाने दिसून येत आहे. सक्षम गटविकास अधिकारी नसल्यामुळे ग्रामसेवकांवरील प्रशासकीय वचक कमी झाला असून ग्रामपंचायतींचा कारभार ढिसाळ पद्धतीने सुरू असल्याची चर्चा सर्वसामान्य नागरिकांमध्ये होत आहे.

ग्रामपंचायत निवडणुका रखडल्यामुळे शासनाने माजी सरपंचांकडे प्रशासक म्हणून जबाबदारी दिली आहे. मात्र अनेक ठिकाणी प्रशासक आणि ग्रामसेवक यांच्यातील अंतर्गत वादामुळे गावपातळीवरील निर्णय प्रक्रिया ठप्प झाली आहे. काही ग्रामपंचायतींमध्ये मासिक बैठका नियमित होत नसल्याने विकासकामे रखडली असून नागरिकांच्या समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत आहेत. एन उन्हाळ्यात अनेक गावांमध्ये पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. विहिरी, बोअरवेल कोरड्या पडल्याने नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची आवश्यकता असतानाही संबंधित यंत्रणा निष्क्रिय असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. महिलांना व नागरिकांना दूरवरून पाणी आणण्याची वेळ आली असून प्रशासन मात्र कागदी घोडे नाचवत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

कर वसुली, स्वच्छता, रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा, वीज, शिक्षण व आरोग्याशी संबंधित कामांकडे दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. विविध शासकीय योजनांच्या मंजुरीसाठी ग्रामपंचायत प्रशासनाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने गावांचा विकास ठप्प झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

सक्षम गटविकास अधिकारी नसल्यामुळे ग्रामसेवकांवर नियंत्रण राहिले नसून काही ठिकाणी मनमानी कारभार वाढल्याची चर्चा आहे. त्यामुळे भ्रष्टाचार, अनियमितता आणि आर्थिक गैरव्यवहारांना खतपाणी मिळत असल्याचा आरोपही नागरिकांकडून होत आहे.

गावांच्या विकासासाठी प्रशासन आणि ग्रामसेवक यांच्यात समन्वय निर्माण करून ढिसाळ कारभाराला आळा घालावा, पाणीटंचाईवर तातडीने उपाययोजना कराव्यात व ग्रामपंचायतींचा कारभार सुरळीत करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. वार्षिक आठवडी बाजार लिलाव सस्पेन्स काय.. लिलाव पद्धत दरवर्षी मार्च चा अखेर होत असताना प्रशासकीय कार्यकाळात काही गाजावाजा न करता हा लिलाव करण्यात आला पाच लाख 21 हजार रुपये आठवडी बाजार लिलावित झाल्याची अधिकृत माहिती मिळाल्याने तरीपण ग्रामपंचायतच्या सेवक, कर्मचारी,सफाई कामगार यांच्या मागील दोन ते चार महिन्यापासून वेतन मानधन रखडण्याचा आलं. लिलावातून आलेली रक्कम ची काय वाट लावली अशी चर्चा सर्वसामान्य नागरिकांत होत आहे. ग्रामसेवक सोबत समन्वयक जुळत नसल्याच्या कारणामुळे मी प्रसासकीय सरपंच पद स्वीकार करण्यात असमर्थ आहे म्हणून मी माझा राजीनामा ग्रामपंचायत मध्ये सादर केला आहे.

## स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू मोहिमेत कचरा व्यवस्थापन नियोजनावर भर

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू मोहिमेला ग्रामपंचायत स्तरावर चांगला प्रतिसाद मिळत असून मोहिमेच्या तिसऱ्या दिवशी, बुधवार दि. ३ जून रोजी गावांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या घटकांची ओळख पटवून त्यांची यादी तयार करण्याची विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून गावांमधील कचरा निर्मितीचे प्रमुख स्रोत निश्चित करून भविष्यातील घनकचरा व्यवस्थापनासाठी आवश्यक नियोजन करण्यात येणार आहे. कचरा संकलन, वर्गीकरण व विल्हेवाट व्यवस्थेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ही माहिती उपयुक्त ठरणार आहे. मोहिमेअंतर्गत दि. ४ जून रोजी स्वच्छता जनजागृती, वृक्षारोपण आणि परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील दृश्यमान स्वच्छता, सार्वजनिक घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन सुविधांची देखभाल-दुरुस्ती तसेच या कामांमध्ये नागरिकांच्या सक्रिय सहभागाचे महत्त्व याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. याच दिवशी एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण मोहिमेदेखील राबविण्यात येणार आहे. स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत कचरा व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी ग्रामपंचायती, ग्रामस्तरीय समित्या व नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद नांदेड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# टाकेद येथे १००% अनुदानावर एस सी एस टी प्रवर्गातील शेतकऱ्यांना ड्रीप योजना शिबिर संपन्न

- शेकडो शेतकऱ्यांनी भरले ऑनलाइन अर्ज
- पोकरा अंतर्गत 90% अनुदान तर पारस ड्रीप इरिगेशन कंपनी शेतकऱ्यांना देणार १०% अनुदान






इगतपुरी : (स. गांवकरी)

इगतपुरी तालुक्याच्या पूर्व भागातील सर्वतीर्थ टाकेद येथे प्रगतिशील शेतकरी दौलत बांबळे,सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र घोरपडे, राम शिंदे, डॉ श्रीराम लहामटे, संग्राम पाटील,दिलीप बांबळे यांच्या शिष्टमंडळाच्या वतीने व पारस ड्रीप इरिगेशन कंपनीच्या सौजन्याने पोकरा अंतर्गत शेतकऱ्यांना १००% अनुदानावर ड्रीप योजनेचे ऑनलाइन अर्ज भरणे प्रक्रियेचे भव्य दिव्य शिबिराचे आयोजन सर्वतीर्थ टाकेद येथील राम सीता लॉन्समध्ये करण्यात आले होते.तालुका कृषी अधिकारी रामदास मडके व महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत माहितीनुसार शासनाकडून पोकरा योजने अंतर्गत ,नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाअंतर्गत (पोकरा) ठिबक सिंचनासाठी (Drip) अर्ज स्वीकारणे सध्या सुरू आहे.

आवश्यक कागदपत्रे:ॲग्रीस्टॅक शेतकरी आयडी (Agristack Farmer ID)सातबारा (७/१२) आणि ८ अ (8A) उताराआधार कार्ड (मोबाइल क्रमांकाशी लिंक केलेले) बँक पासबुकची प्रत व जातीचे प्रमाणपत्र (अनुसूचित जाती/ जमातीसाठी लागू असल्यास)

ड्रीप सिंचन साठी शेतकऱ्यांना 90 टक्के अनुदान आणि 10 % शेतकरी लाभार्थ्यांचा सहभाग अशी ही योजना असून शेतकऱ्यांचे 10% सुद्धा पारस ड्रीप इरिगेशन कंपनी भरणार आहे.म्हणजेच या कंपनी मार्फत ऑनलाइन अर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना 100% अनुदानावर या योजनेचा लाभ फक्त अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती एस सी एस टी प्रवर्गातील शेतकऱ्यांनाच मिळणार आहे.ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर महिनाभराच्या कालावधीत शेतकरी बांधवांना या योजनेचा थेट लाभ मिळणार असल्याने या आयोजित ऑनलाइन अर्ज भरणे मार्गदर्शन शिबिराला टाकेद व पंचक्रोशील अनुसूचित जाती जमातीच्या बहुसंख्य शेतकरी बांधवांनी मोठी गर्दी केली होती. पोकरा अंतर्गत कोणकोणत्या योजना व त्यापासून चे मिळणारे फायदे हे शेतकरी बांधवांना माहीत नसतात व माहीत होतं ही नाही अनेक ठिकाणी स्थानिक राजकीय पुढारी लोकप्रतिनिधी हे या योजना फक्त त्यांच्यासह त्यांच्या ठराविक शेतकऱ्यांना सांगतात व गोरगरीब शेतकऱ्यांकडून बेकायदेशीर रित्या अवाजवी पैसे व कागदपत्रे घेऊन या योजना राबविण्यात येतात परंतु याला कुठेतरी पूर्णविराम बसावा व वंचित ग्रामीण भागातील आदिवासी मागासवर्गीय गोरगरीब कष्टकरी शेतकरी बांधवांना शासनाच्या पोकरा अंतर्गत येणाऱ्या योजनांची एकाच छताखाली मोफत थेट सविस्तर माहिती मिळावी व राजकीय पुढाऱ्यांकडून एजेंट कडून या योजनांच्या नावाखाली शेतकऱ्यांची होणारी लयलूट थांबावी याच हेतूने ऑनलाइन अर्ज भरून योजनांचा वंचित शेतकरी बांधवांना थेट लाभ मिळावा याच हेतू उद्देशाने प्रगतिशील शेतकरी दौलत बांबळे,सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र घोरपडे, राम शिंदे, डॉ श्रीराम लहामटे, संग्राम पाटील,दिलीप बांबळे यांच्या शिष्टमंडळाच्या वतीने व पारस ड्रीप इरिगेशन कंपनीच्या सौजन्याने पोकरा अंतर्गत ड्रीप योजनेचे ऑनलाइन अर्ज शिबिर आयोजित करण्यात आले होते. गुरुवारी सकाळी 8 वाजेपासून दिवसभर राम सीता लॉन्समध्ये आयोजित करण्यात आलेल्या या भव्य ऑनलाइन अर्ज शिबिराला शेकडो शेतकरी बांधवांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती दर्शवत आपापले ऑनलाइन अर्ज भरून घेतले.या शिबिरात अनेक वंचित आदिवासी मागासवर्गीय आजपर्यंत वंचित असलेल्या शेतकरी बांधवांना या योजनांची माहिती मिळाली व थेट ऑनलाइन अर्ज भरायला मिळाला.





# कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात काजव्यांचा प्रकाशोत्सव

- गर्दी गोंधळ गोंधळ हुल्लडबाजीला आळा
- वन्यजीव विभागाने यंदा केली कठोर नियमावली

(स. गांवकरी)

नाशिक शहरापासून अवघ्या ७० किलोमीटर अंतरावर असलेल्या भंडारदरा येथील कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात काजव्यांचा प्रकाशोत्सव रंगात आला असून दोन दिवसांपूर्वी विजांच्या कडकडाटात पडलेल्या वळव्याच्या पावसाने दमदार हजेरी लावल्यानंतर काजव्यांच्या लखलखाटात अभयारण्यातील वृक्षराजीवर अधिकच वाढला आहे निसर्गाचा सृष्टी वरील हा अद्भुत नजारा डोळ्यात साठविण्यासाठी पर्यटकांची पावले मोठ्या संख्येने अभयारण्याकडे वळू लागली आहेत कठोर नियमावली आणि प्रभावी अंमलबजावणीमुळे यंदा नाशिक वन्यजीव विभागाने पर्यटकांना शिस्त लावण्यास बऱ्यापैकी यश मिळविले आहे राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने मागील वर्षी वन्यजीव विभागाला काजव्यांच्या उत्पत्ती काळात अभयारण्यात येणाऱ्या पर्यटकांना नियमांची कठोर चौकट आखून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची ताकद दिली होती यानुसार वन्यजीव विभागाने यावर्षी अभयारण्यात दोन्ही प्रवेशद्वारावरून सायंकाळी सहा ते रात्री नऊ वाजेपर्यंत प्रवेशाची वेळ मर्यादा निश्चित केली आहे या वेळेत केवळ दोन हजार पर्यटकांना आत मध्ये सोडण्यात येत आहे प्रत्येक पर्यटकांचा आधार कार्डचा फोटो वाहन क्रमांक पर्यटक संख्या नोंदवून घेतली जात आहे मोबाईल टॉर्च बॅटरी कॅमेऱ्याच्या फ्लॅशचा वापरावर तसेच लहान मुलांच्या लाईटच्या शूज वर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे अभयारण्यात येणाऱ्या पर्यटकांनी वनविभागाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करत पर्यावरण स्नेही इको टुरिझम चा आनंद घ्यावा असे आवाहन अभयारण्याचे सहाय्यक वन संरक्षक अनिल पवार यांनी केले आहे

पर्यावरण स्नेही इको टुरिझम चा भागवा. अति संवेदनशील जैवविविधता या भागात आहे का जवा अल्पायुषी कीटक या जैवविविधतेचा महत्त्वाचा घटक आहे काजव्याचा हा प्रजनन काळ असतो नर काजवा लुकलुकत मादीला स्वतःकडे आकर्षक करत एक प्रकारे संवाद साधत असतो आपल्या गोंगाट गोंधळ व कल्लोळामुळे त्याचा हा संवाद तुटून नरकाजवा मृत्युमुखी पडू शकतो बे जबाबदार वर्तन टाळावे कृत्रिम प्रकाश साहित्याचा कुठलाही वापर अभयारण्य क्षेत्रात करू नये असे आव्हान वन्य जीव विभागासह निसर्गप्रेमी पर्यावरण अभ्यासकांकडून करण्यात आले आहे हरिचंद्र गडाच्या पायथ्यालाही चमचम राजूर वनपरिक्षेत्राच्या येथील हरिचंद्र गडाच्या पायथ्याशी असलेल्या फोप संडी पाच नई कुमशेत या गावांमधील वृक्ष राजे वर सुद्धा काजव्यांची चमचम पहावयास मिळत आहे या ठिकाणीही वन्यजीव विभागाने रात्रीची गस्त वाढविली आहे सायंकाळी सहा ते रात्री नऊ या निश्चित केलेल्या कालावधीत पर्यटक या भागात सुद्धा जाऊन नियमांचे पालन करत काजवे बघू शकतात रोजगार निर्मितीला चालना काजवे बघण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांमुळे या भागात रोजगार निर्मितीला चालना मिळाली आहे अभयारण्यातील गावांमध्ये रात्रीच्या वेळी मुक्कामी कॅम्पेनिंग राहणाऱ्या पर्यटकांमुळे स्थानिक आदिवासी बांधवांनाही रोजगार मिळत आहे मुक्कामी राहणाऱ्या पर्यटकांना सुद्धा रात्री जंगलात फिरण्यास मज्जाव करण्यात आला आहे १९ पार्किंग सणाची उभारणी पर्यटकांनी अभयारण्यात प्रवेश केल्यानंतर त्यांची वाहने पार्किंग स्थळावरच उभी करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

वन्यजीव विभागाने अभयारण्य क्षेत्रात रस्त्यालगत पार्किंग स्थळे तयार केली आहेत या ठिकाणी बॅरिकेट्स वनरक्षक वनमजुरांची नियुक्ती करण्यात आली आहे प्रत्येक पार्किंग सळी तसेच काजवेच्या झाडावर आहेत तेथे वन कर्मचारी पर्यटकांना आवश्यक सूचना देत होते असे वनपरिक्षेत्र अधिकारी रुपेश गावित यांनी सांगितले पर्यटकांनी रस्त्याच्या कडेने पायी चालत झाडावर लुकलुकणारे काजवे बघण्याचा आनंद शनिवारी व रविवारी मोठ्या संख्येने घेतला.

# थोडक्यात पण महत्वाचे

## डांग जिल्ह्यात जूनच्या पहिल्याच दिवशी विजांच्या कडकडाटासह पाऊस



डांग (गुजरात) (स. गांवकरी) : राज्याच्या शेवटच्या टोकाला असलेल्या डांग जिल्ह्यात जून महिन्याच्या पहिल्याच दिवशी मान्सूनपूर्व पावसाने दमदार हजेरी लावली. सोमवारी उशिरा रात्री आहवा, वघई, सुबीर, सापुतारा, पूर्व पट्टा तसेच सीमावर्ती भागांमध्ये विजांच्या कडकडाटासह आणि जोरदार वाऱ्यासह पाऊस झाला. या पावसासोबत आलेल्या वादळामुळे जिल्ह्यात अनेक ठिकाणी नुकसान झाल्याची नोंद झाली आहे. आहवा तालुक्यातील खेरिया गावातील प्राथमिक शाळेच्या वर्गखोल्यांवर बसविण्यात आलेले पत्रे जोरदार वाऱ्यामुळे उडून गेल्याने शाळेचे मोठे नुकसान झाले. वादळाचा वेग इतका प्रचंड होता की शाळेवरील सर्व पत्रे जमिनीवर कोसळली. या घटनेत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. वघई तालुक्यात वघई-आहवा राज्य महामार्गावरील पिंपरी गावाजवळ एक मोठे साईनबोर्ड रस्त्यावर कोसळले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. दरम्यान, गुजरातचे प्रसिद्ध हिल स्टेशन सापुतारा येथेही वादळाने थैमान घातले. पर्यटनस्थळांच्या विविध भागांमध्ये मध्यम आकाराची अनेक झाडे उन्मळून पडल्याने काही काळ वाहतूक आणि पर्यटकांच्या हालचालींवर परिणाम झाला. उशिरा रात्री झालेल्या पावसामुळे अनेक दिवसांपासून उष्णतेने तापलेल्या भूमीला दिलासा मिळाला. मंगळवारी सकाळी संपूर्ण डांग जिल्ह्यात वातावरणात गारवा पसरला असून हवामान अतिशय आल्हाददायक झाले आहे. सध्या उन्हाळी सुट्ट्यांचा शेवटचा आठवडा सुरू असल्याने या रम्य वातावरणाचा आनंद घेण्यासाठी सापुतारा येथे पर्यटकांची मोठी गर्दी झाली आहे. पाऊस, धुके आणि थंडगार हवेमुळे पर्यटनस्थळांवर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून पर्यटकांनी विविध साहसी उपक्रमांचा आनंद घेत संस्मरणीय अनुभव घेतला.

## दुहेरी अपघात; कार दरीत कोसळली, तर टोमॅटोने भरलेला ट्रक पलटी



डांग (गुजरात) (स. गांवकरी) : सापुतारा-वघई आंतरराज्य महामार्गावर आज दोन वेगवेगळ्या ठिकाणी अपघाताच्या घटना घडल्या. एका ठिकाणी कार रस्त्यालगतच्या खड्ड्यात कोसळली, तर दुसऱ्या ठिकाणी टोमॅटोने भरलेला ट्रक पलटी झाल्याने मोठे नुकसान झाले. सुदैवाने दोन्ही अपघातांमध्ये जीवितहानी टळली. प्राप्त माहितीनुसार, नवसारीहून महाराष्ट्रातील शिर्डी-शिन्नरकडे जात असलेली कार (क्र. GJ-21-BC-0463) सापुतारा-वघई आंतरराज्य महामार्गावरील शामगहान गावाजवळील यू-टर्न वळणावर आली असता चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे कार रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात जाऊन पडली. या अपघातात कारच्या चेसिस भागाचे मोठे नुकसान झाले असून चालक सुखरूप बचावला. दुसरी घटना बारीपाडा-चिखली परिसरातील यू-टर्न वळणावर घडली. महाराष्ट्रातील कलवण येथून टोमॅटोचा माल घेऊन राजकोटकडे निघालेला ट्रक (क्र. GJ-03-BY-3355) चालकाचे नियंत्रण सुटल्याने रस्त्यालगतच्या संरक्षण भिंतीवर आदळून पलटी झाला. या अपघातात ट्रकचे मोठे नुकसान झाले असून ट्रकमधील टोमॅटोचा संपूर्ण माल रस्त्यावर विखुरला जाऊन मोठे आर्थिक नुकसान झाले. या अपघातात ट्रक चालक आणि क्लिनर यांना किरकोळ दुखापती झाल्या असून त्यांचा चमत्कारिक बचाव झाला आहे. सापुतारा-वघई मार्गावरील तीव्र वळणे आणि उतारांमुळे वाहनचालकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## काय होतं वसमत... आणि काय झालं वसमत?

वसमत (स. गांवकरी) : एकेकाळी शांत, सुरक्षित आणि सर्वसामान्य नागरिकांच्या गरजा पूर्ण करणारे वसमत आज मूलभूत सुविधांच्या अभावामुळे अक्षरशः हतबल झाल्याचे चित्र आहे. शहराचा विकास होत असल्याचे दावे केले जात असले, तरी प्रत्यक्षात नागरिकांना रोज नव्या समस्यांचा सामना करावा लागत आहे.पाणी ची समस्या , वीज , स्वच्छता नाही, सुरक्षा नाही... मग नेमकं आहे तरी काय? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून विचारला जात आहे. पाण्यासाठी नागरिकांची भटकंती करावी लागत आहे. कोट्यवधी रुपये खर्चून जलजीवन मिशन, विविध पाणीपुरवठा योजना आणि नवीन पाईपलाईनची कामे झाली. पण आजही अनेक भागातील नळ कोरडे आहेत. महिलांना ज्येष्ठ नागरिकांना आणि सर्वसामान्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. योजना पूर्ण झाल्याचे दाखवले जाते, मात्र पाणी कुठे गेले याचे उत्तर कोणाकडेच नाही. महावितरणच्या गलथान कारभारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. कधीही वीज जाते किती वेळ जाणार याची माहिती नसते. विद्यार्थ्यांचे शिक्षण, व्यापाऱ्यांचा व्यवसाय आणि घरगुती जीवन विस्कळीत झाले आहे. लोकप्रतिनिधी मात्र या ज्वलंत प्रश्नावर मौन बाळगून असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग, तुंबलेल्या नाल्या, रस्त्यावर वाहणारे सांडपाणी आणि दुर्गंधी यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. स्वच्छतेवर लाखो रुपये खर्च होत असल्याचे सांगितले जाते.

# संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाणी जपून वापरावे



- नगराध्यक्ष सुजाता येंड्रलवार व उपनगराध्यक्ष हसन खान पठाण यांचे आवाहन

किनवट: (स. गांवकरी)

भारतीय हवामान खात्याने यंदाच्या पावसाबाबत व्यक्त केलेल्या अंदाजाच्या पार्श्वभूमीवर किनवट शहरात संभाव्य पाणीटंचाईची परिस्थिती उद्भवू शकते. त्यामुळे नागरिकांनी आतापासूनच पाण्याचा काटकसरीने वापर करावा व आवश्यक उपाययोजनांसाठी मानसिक तयारी ठेवावी, असे आवाहन किनवट नगर परिषद नगराध्यक्ष सौ. सुजाता येंड्रलवार व उपनगराध्यक्ष हसन खान पठाण यांनी केले आहे. नगर परिषद कार्यालयातील नगराध्यक्ष सभागृहात आयोजित बैठकीत शहरातील पाणीस्थिती, आगामी पर्जन्यमानाचा अंदाज तसेच पाणीटंचाई टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष सौ. येंड्रलवार यांनी सांगितले की, आगामी काळात अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्यास शहराच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळून आवश्यक तेवढ्याच पाण्याचा वापर करावा. उपनगराध्यक्ष हसन खान पठाण यांनी देखील नागरिकांना सहकार्याचे आवाहन करताना सांगितले की, पाणी ही अत्यंत महत्त्वाची नैसर्गिक संपत्ती असून तिचे संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता नागरिकांनी घरगुती स्तरावर पाणी साठवणूक, पुनर्वापर आणि बचतीच्या उपाययोजना राबविणे आवश्यक आहे.

# नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी चिंतन सोहळयास भक्तिमय वातावरणात प्रारंभ

## ज्ञानेश्वरीचे श्रवण मनन चिंतन केल्यास मनुष्याला जीवनात विवेकाची प्राप्ती-देविदास महाराज म्हस्के शास्त्री

नेवासा: (स. गांवकरी)





ग्रंथराज ज्ञानेश्वरी व अमृतानुभव ग्रंथाचे रचनास्थान असलेल्या नेवासा येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरामध्ये अधिक मासाच्या निमित्ताने वेदांताचार्य महंत श्री देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या सुश्राव्य वाणीतून संगीतमय "ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी चिंतन सोहळयास संत माऊलींच्या मूर्तीचे पूजन करून दिपप्रज्वलनाने प्रारंभ करण्यात आला.ब्रम्ह विद्येची खान असलेल्या ज्ञानेश्वरीचे श्रवण मनन चिंतन केल्यास मनुष्याला जीवनात विवेकाची प्राप्ती होईल असे प्रतिपादन वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांनी यावेळी बोलतांना केले. यावेळी ज्ञानेश्वर चिंतन सोहळयाच्या शुभारंभ प्रसंगी वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री,देवस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग,रामायणाचार्य नंदकिशोर महाराज खरात,गहिनीनाथ महाराज आढाव, रामकृष्ण विवेकानंद आश्रमाचे महंत स्वामी ज्ञानेश्वरजी महाराज,राम महाराज खरवंडीकर,अंजाबापू महाराज कर्डीले,कोंडीराम महाराज पेचे,हरि महाराज भोगे,मंगेश महाराज वाघ,कोंडीराम महाराज पेचे,राजेंद्र महाराज आसने,विश्वस्त ज्ञानेश्वर माऊली शिंदे,भिकाजी जंगले, रामभाऊ जगताप, कृष्णाभाऊ पिसोटे,कैलास जाधव, जनसंपर्क अधिकारी भैय्या कावरे,डॉ.संजय सुकाळकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी आलेल्या सर्व संत महंत व माऊली भक्तांचे संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले.भगवत गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील ५४ व्या श्लोकात अर्जुनाने भगवान श्रीकृष्णांना "स्थितप्रज्ञ कोण?" असा प्रश्न विचारला त्यावर भगवान श्रीकृष्णांनी संत, महात्मा, ज्ञानी पुरुष यांचे स्वरूप स्पष्ट करणारे अमूल्य विचार मांडले याच श्लोकांचे संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या दुसऱ्या अध्यायातील शेवटच्या ८६ ओव्यांमधून अत्यंत सखोल आणि रसाळ विवेचन केले ते विवेचन आपल्याला वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या वाणीतून श्रवण करायला मिळणार असल्याने माऊली भक्तांनी ज्ञानेश्वरी चिंतन सोहळयाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

यावेळी ज्ञानेश्वरीच्या चिंतन सोहळयात बोलतांना वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री म्हणाले की मानवी जीवनाला स्पर्श करणारे ज्ञान संत ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरीत सांगितले, सर्व मानव जातीचे पुण्य फळा आले म्हणून ज्ञानोबारायांनी ज्ञानेश्वरी जगाच्या उद्धारासाठी दिली.

# ज्येष्ठ पत्रकार भगवान चंदे यांचा ६० वा वाढदिवस वृद्धाश्रमात साजरा

भिवंडी: (स. गांवकरी)

- अनावश्यक खर्चाला फाटा देत जपली सामाजिक बांधिलकी
- वृद्धांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य



"वाढदिवस म्हणजे केवळ स्वतःपुरता आनंद नाही. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो. या भावनेतून ९० माय-बापांसोबत काही क्षण घालवले. त्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान हेच माझ्यासाठी खरे गिफ्ट आहे,"
- जेष्ठ पत्रकार - भगवान चंदे

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हाध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार भगवान चंदे यांनी आपला ६० वा वाढदिवस वेगळ्या पद्धतीने साजरा करून समाजापुढे एक आदर्श ठेवला. वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून त्यांनी भिवंडी तालुक्यातील खडवली येथील 'मातोश्री वृद्धाश्रम' येथे वृद्धांसमवेत दिवस साजरा केला.

यावेळी चंदे यांनी वृद्धाश्रमातील आजी-आजोबांना अल्पोपाहाराचे वाटप केले व त्यांच्याशी संवाद साधत वाढदिवसाचा आनंद साजरा केला. उपस्थित वृद्धांनी औक्षण करून, टाळ्यांच्या गजरात त्यांना दीर्घायुष्य व उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या. "आज आम्हाला कुटुंबाची आठवण आली. मुलगा भेटल्यासारखे वाटले," अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या. या उपक्रमास महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा सहसचिव मिलिंद जाधव, भिवंडी तालुका अध्यक्ष मेघनाथ विशे, पत्रकार कैलास ढमणे, पंढरीनाथ पाटील तसेच भारती चंदे, प्रतीक काठोळे, गणेश कराळे व वृद्धाश्रमाचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रसंगी पत्रकार भगवान चंदे, कैलास ढमणे व लकीचंद पाटील यांनी वृद्धाश्रमाला आर्थिक मदत देऊन सामाजिक बांधिलकी जपली. केवळ सत्कार व मेजवान्यांपुरता मर्यादित न राहता दुर्लक्षित घटकांसोबत वाढदिवस साजरा करण्याच्या त्यांच्या निर्णयाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. वृद्धाश्रमातील कार्यक्रमानंतर भगवान चंदे यांनी सपत्नीक दहागाव येथील श्री स्वामी समर्थ मठात पादुकांचे दर्शन घेतले व गुरुवारी येणाऱ्या भक्तांसाठी महाप्रसादाची व्यवस्था केली. सायंकाळी पाच ते रात्री उशिरापर्यंत त्यांनी ६० शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून शैक्षणिक चळवळीला हातभार लावला. यावेळी पत्रकार संतोष गायकर, अरुण ठाकरे, अनंता घागस, संतोष चोणकर, पांडुरंग गायकवाड, प्रवीण काठोळे, प्रतिभा काठोळे, भगवान बोंद्रे, शांताराम भोईर, दीपक चंदे, दीप्ती चंदे यांच्यासह अनेक ग्रामपंचायत अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिषेक चंदे, नलिनी वेखंडे, सुभाष सातपुते, पारू सातपुते आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# अमोल भगत यांची बदली नयागाव येथे होणार नियुक्ती

हिमायतनगर: (स. गांवकरी)



नांदेडचे जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्ह्यातील पोलीस प्रशासनात मोठे फेरबदल केले असून, हिमायतनगर पोलीस ठाण्याचे धडाकेबाज अधिकारी पीआय अमोल भगत यांची नयागाव येथे बदली झाली आहे. त्यांच्या जागी मुखेड येथून पोलीस निरीक्षक केंद्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक अमोल भगत यांनी आपल्या कार्यकाळात हिमायतनगर शहराला एक उत्तम शिस्त लावली. अत्यंत कर्तव्यदक्ष, न्यायप्रिय आणि सर्वसामान्यांना योग्य दिशा देणारे मार्गदर्शक म्हणून त्यांनी जनतेच्या मनात हक्काचे स्थान निर्माण केले. गुन्हेगारीवर वचक निर्माण करतानाच त्यांनी नेहमीच गरिबांना न्याय देण्याचे काम केले. पोलीस स्टेशनमध्ये येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला सलोख्याची आणि सन्मानाची वागणूक देऊन त्यांनी पोलीस प्रशासनाची प्रतिमा उंचावली.

अमोल भगत यांनी केवळ कायदा व सुव्यवस्थाच राखली नाही, तर आपल्या कल्पकतेतून हिमायतनगर पोलीस स्टेशनचा संपूर्ण चेहरामोहरा आणि नकाशाच बदलून टाकला. त्यांनी अथक परिश्रम घेऊन पोलीस ठाण्याच्या इमारतीचे आणि परिसराचे नूतनीकरण केले, ज्यामुळे आज हे पोलीस स्टेशन अत्यंत सुसज्ज, देखणे आणि 'व्ही.आय.पी.' (VIP) दर्जाचे बनले आहे. पोलीस ठाण्यात येणाऱ्या नागरिकांसाठी उत्कृष्ट सुविधा निर्माण करत त्यांनी या संपूर्ण परिसराला एक आदर्श आणि भव्य स्वरूप मिळवून दिले आहे.

# श्रीधर पांचाळ यांच्या कुटुंबाला ३१ हजार ७०० रुपयांची मदत

## वसंत सुगावे पाटील मित्रमंडळाचा पुढाकार; शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचे आश्वासन

नायगाव: (स. गांवकरी)



घुंगराळा येथील युवा कलाकार तथा कीर्तन, सप्ताह आणि विवाह सोहळ्यांमध्ये गायन-वादन करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे कै. श्रीधर गोपीनाथ पांचाळ यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस वसंत सुगावे पाटील यांनी पुढाकार घेत मित्रमंडळाच्या माध्यमातून ३१ हजार ७०० रुपयांची आर्थिक मदत जमा करून ती पांचाळ कुटुंबीयांच्या स्वाधीन केली.

कै. श्रीधर पांचाळ यांचे गेल्या आठवड्यात अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने त्यांच्या निधनामुळे परिवारासमोर मोठे संकट उभे राहिले आहे. यापूर्वीही श्रीधर पांचाळ यांच्या भावाचे अकाली निधन झाल्यानंतर वसंत सुगावे पाटील यांनी त्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदतीचा हात दिला होता. यावेळीही मित्रमंडळाच्या सहकार्याने निधी उभारून पांचाळ कुटुंबाला आधार देण्यात आला.

यावेळी बोलताना वसंत सुगावे पाटील यांनी, "पांचाळ कुटुंबाला भविष्यातही शक्य ती सर्व मदत केली जाईल. तसेच श्रीधर पांचाळ यांच्या मुलांना व पत्नीला शासनाच्या महिला व बालविकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई बालसंगोपन योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील," असे सांगितले. या योजनेअंतर्गत पात्र मुलांना दरमहा २,२५० रुपयांचे अर्थसाहाय्य मिळू शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रसंगी घुंगराळा येथील सरपंच सौ. रूक्मिणबाई पांचाळ, माजी विस्तार अधिकारी नागोराव दंडेवाड, सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष श्याम यमलवाड, अच्युतराव ढगे, माजी उपसरपंच शिवाजी ढगे, व्यंकटराव सुगावे, प्रल्हाद ढगे, भगवान सुगावे, राम सुगावे, आनंदा सुगावे, परबंता हनमंते, विलास ढगे, राजेश ढगे, पांडुरंग मेलफदवार, साईनाथ सुगावे, मुरारी तुरटवाड, बालाजी हाळदेवाड, सहदेव तुरटवाड, बंटी बोधनकर, माधव जलदेवार यांच्यासह ग्रामस्थ, मित्रपरिवार व पांचाळ कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कलाकाराच्या कुटुंबाला समाजाचा आधार

गायन-वादनाच्या कलेच्या माध्यमातून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या श्रीधर पांचाळ यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदतीचा हात देत समाजातील संवेदनशीलतेचे दर्शन घडले आहे. मित्रमंडळाच्या माध्यमातून उभारण्यात आलेली मदत आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याची भूमिका यामुळे कुटुंबाला मोठा दिलासा मिळणार आहे.